# पुणे महानगरपालिका
## जाहीर प्रकटन

पुणे शहरांमध्ये पावसाळा वेळेवर सुरु होत असल्याने पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेली घरे, गृहरचना संस्था/इतर इमारतीच्या धोकादायक सीमाभिंती / संरक्षित भिंती लगत असणारी घरे/झोपड्या/लेबर कॅम्प, डोंगर माथा- डोंगर उतार क्षेत्रालगत नदी/ नाल्यालगत तसेच अस्तित्वातील खोदकामालगत असणा-या घरे/ झोपड्यांना धोका उत्पन्न होऊ शकतो. त्याच प्रमाणे सिमा भिंत / संरक्षक भिंती लगत असणारे मातीचे भराई/ मातीचे ढिगारे मध्ये पाणी मुरून सीमा भिंतीस धोका उत्पन्न होऊन जीवित व वित्त हानी होऊ शकते

तरी सदर धोकादायक इमारत/शेड/झोपड्यांमधील नागरिकास नम्र आवाहन करण्यात येते की, धोकादायक इमारती/शेड्स/झोपड्या, जुन्या व जीर्ण तथा मोडकळीस आलेल्या बांधकाम क्षेत्रामध्ये किंवा लगत राहणा-या नागरीकांच्या जिवितास धोका टाळण्यासाठी या मिळकतीची तपासणी करून सदर धोकादायक इमारती पैकी धोका संभवू शकणा-या बांधकामाचा भाग तातडीने उतरवून घेणे बाबत संबधित नागरिक/विकसक/मिळकतदार/वहिवाटदार/ भाडेकरू यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे, आपण वास्तव्यास असलेल्या इमारती सुरक्षित राखण्याची जबाबदारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २६५ अन्वये मिळकतदाराची /वहिवाटदाराची आहे. तसेच अशा धोकादायक मिळकतीमध्ये वास्तव्यास असणा-या नागरीकांनी सुरक्षित ठिकाणी त्वरीत स्थलांतरीत होण्याची खबरदारी घेण्यात यावी.

पुणे महानगरपालिकेकडे स्वतंत्र घरपाडी विभाग व आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यरत असून अशा प्रकारच्या धोकादायक बांधकामाची माहिती तसेच एखादी इमारत व इमारतीचा काही भाग कोसळल्यास त्याची माहिती नागरीकांनी पुणे महानगरपालिकेच्या घरपाडी विभाग व आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपर्क क्रमांक (०२०) २५५०१००० व (०२०) २५५०६८०० यांचेकडे दुरध्वनीद्वारे तत्काळ कळविण्यात यावे. तसेच अधिक तपशिलासाठी http//pmc.gov.in/sites/default/files/Regular%20Public%20Disclosure/jahir-prakatan.pdf या लिंकवर माहिती उपलब्ध आहे.

पावसाळा सुरु होत असल्याने नागरीकांच्या जिवितास होणारा धोका व संभाव्य जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने सदर कामी नागरीकांनी पुणे महानगरपालिकेस वर नमूद केल्याप्रमाणे जरूर ते सहकार्य करावे, अशी विनंती आहे.

शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner